
# शेतीविषयक पारित विधेयके आणि शेतकरी आंदोलने

संपादक :-
प्रा. डॉ. सुरेश सोमकुवर
प्रा. डॉ. सतीश महल्ले
प्रा. डॉ. ज्योती कवठे



OM SAI PUBLISHERS & DISTRIBUTORS
Nagpur | Pune | Delhi

# शेतीविषयक पारित विधेयके आणि शेतकरी आंदोलने

संपादक
डॉ. सुरेश रा. सोमकुवर
डॉ. सतीश रा. महल्ले
डॉ. ज्योती वि. कवठे

ओम साई पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स

PRINCIPAL
Art, Science & Commerce
College, Chikhaldara

➤ शेतीविषयक पारित विधेयके आणि शेतकरी आंदोलने

➤ © सर्व हक्क प्रकाशकाधिन

No part of this book shall be reproduced, stored in retrieval system, or translated in any form or by any means, electronic, mechanical, photocopying and/or otherwise without the prior written premission of the publishers.

➤ ISBN : 978-93-91201-80-7

➤ प्रथम आवृत्ती : २०२१

➤ प्रकाशक :

श्री. गणेश राऊत

ओम साई पब्लिशर्स आणि डिस्ट्रीब्युटर्स

२९, इंदिरानगर, टी.बी. वार्डच्या मागे, नागपुर.

मो.नं. : ९९२३६९३५०६, ई—मेल: ospdnagpur@yahoo.com

➤ मुद्रक व डिस्ट्रीब्युटर्स :

साई ज्योती पब्लिकेशन

मो.नं. : ९७६४६७३५०३

ई—मेल : sjp10ng@gmail.com, वेब साईट : www.saijyoti.in

➤ सेल्स ऑफिस :

बुक्स एन बुक्स

६५, शॉप नं. २, राधिका पॅलेस,

हनुमान नगर रोड, मेडिकल चौक, नागपुर.

मो.नं. : ९९२३५९३५०३

➤ शाखा :

पुणे शाखा :

२०३, परिस स्पर्श हाईट,
अंबामाता मंदीर रोड,
अंबाई दरा, धायरी,
पुणे—४११०४१.
मो.नं. : ९४२०३१८८८४

न्यु दिल्ली शाखा :

२१३, वर्धन हाऊस, ७/२८
अंसारी रोड, दरियागंज,
न्यु दिल्ली—११०००२.
मो.नं. : ८८८८८२८०२६,
९३२५६५६६०२

➤ अक्षर रचना :

श्री गणेश ग्राफिक्स, नागपुर.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | चुआड आदिवासी शेतकऱ्यांचे आंदोलन (इ.स. १७६९ ते १८०५)<br>लक्ष्मण न. गोरे | ०१—०६ |
| २ | भारतीय कृषी व्यवस्था कायदे आणि आंदोलने (विशेष संदर्भ : वर्धा जिल्हा)<br>डॉ. एच. यु. पेटकर | ०७—१३ |
| ३. | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी व आधुनिक कृषी व्यवस्था<br>डॉ. माधुरी झाडे | १४—२० |
| ४. | शेतीविषयक पारित विधेयके आणि शेतकरी आंदोलने<br>डॉ. अरूणा थुल (देवगडे) | २१—२५ |
| ५. | जागतिकीकरणाचे ग्रामीण भागातील शेती व इतर व्यवसायातील परिणाम<br>प्रा. कोल्हे तुकाराम त्रिंबकराव | २६—३० |
| ६. | शेतीविषयक पारित कायदे आणि शेतकरी आंदोलन<br>डॉ. गजानन रा. सोमकूवंर | ३१—३५ |
| ७. | शेतीविषयक पारित विधेयके व शेतकरी आंदोलनाचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>डॉ. रुपेश वामनराव खुबाळकर, डॉ. अमोल गिरिधरराव आवंडकर | ३६—४३ |
| ८. | कृषी विधेयक २०२० आणि शेतकरी आंदोलनाची कारणमीमांसा<br>मनिषा एस. सोनटक्के | ४४—४८ |
| ९. | शेतीविषयक पारित विधेयके आणि शेतकरी आंदोलने<br>प्रा. डॉ. निता सोमनाथे (गभणे), श्रीमती गोपिकाबाई भुरे | ४९—५५ |
| १०. | शेतकरी आंदोलनाची दिशा व दशा<br>प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम | ५६—५९ |
| ११. | कृषि विधेयकाची गरज आणि समोरील आव्हाने<br>डॉ. आशिष ठाणेकर | ६०—६५ |
| १२. | नवीन कृषी कायदा २०२० आणि शेतकरी आंदोलन<br>डॉ. प्रवीण भास्करराव हाडे | ६६—७२ |

# भारतीय कृषी व्यवस्था कायदे आणि आंदोलने (विशेष संदर्भ : वर्धा जिल्हा)


## डॉ. एच. यु. पेटकर

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा.
९४०३६१.८३७५, harishpetkar2012@gmail-com


शेकडो वर्षापासून भारतीय सामाजिक व आर्थिक विकासाचा पाया हा शेती आहे. भारतीय समाजाचे अध्ययन करीत असताना यामध्ये प्रामुख्याने कृषी व्यवस्थेचे अध्ययन केल्याशिवाय ते परिपूर्ण होऊ शकत नाही. आजही आपण भारत हा कृषीप्रधान देश आहे असे म्हणत असतो कारण आजही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेतीकडे बघितले जाते. स्वातंत्र्यापूर्वी भारताच्या एकूण लोकसंख्यापैकी ८५ टक्के जनता ही ग्रामीण भागात राहत होती तसेच अनेक व्यक्तीचा व्यवसाय हा शेती व शेतीशी निगडीत होता. आजही ६० टक्यांपेक्षा अधिक जनता ही ग्रामीण भागात राहते व प्रामुख्याने शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय करते त्यामुळे खऱ्या अर्थाने इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांचे जीवनमान ज्या व्यवसायाशी निगडीत आहे त्या व्यवसायाची प्रगती होऊन ते व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडून यावयास पाहिजे होती परंतु प्रत्यक्ष मात्र परिस्थिती अगदी उलटी दिसून येते. शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय करणाऱ्या शेतकरी वर्गाची स्थिती अतिशय दयनिय स्वरुपाची झालेली दिसून येते. मागील २०—२५ वर्षात तर शेतकऱ्यांची स्थिती अतिशय खालावलेली असून अनेक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आणि ह्या आत्महत्यामध्ये सतत वाढ होताना दिसून येत आहे. त्याकरिता जबाबदार कोण? हा प्रश्न सातत्याने पुढे येतो पण त्यांची कारणे मात्र स्पष्टरुपात पुढे येत नाही. महात्मा फुल्यांनी त्यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथामध्ये शेतकऱ्यांच्या दयनिय अवस्थेचे चित्रण केले. धर्मव्यवस्थेने सुध्दा शेतकऱ्यांवर वेगवेगळया रुढी, प्रथा, परंपरा, सामाजिक मूल्यांच्या माध्यमातून अन्यायच केला त्यामुळे तो सातत्याने पिचला गेला. शेकडो वर्षापासून इथला शेतकरी पिचला जात आहे आणि आज त्याचे दृश्य स्वरुप आत्महत्येत होत आहे. पंडित जवाहरलाल नेहरु नंतर या देशाचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री झाले त्यांनी सी. सुब्रहमन्यम यांना कृषी मंत्रीपद दिले हे पद त्यांना अपमानास्पद वाटले कारण पंडित जवाहरलाल नेहरुंच्या मंत्रीमंडळात ते उद्योगपती होते. एका बाजुला कृषीप्रधान देशाचा अभिमान बाळगायचा तर दुसऱ्या बाजुला उद्योगाला प्रतिष्ठा प्रदान करायची अशी धोरणे आपल्याला दिसून येतात. सी. सुब्रहन्यम यांनी नंतर पंचावन्न वर्षापूर्वी शेती तोट्यात आहे हे जाहीरपणे मान्य केले.

१९५० च्या दरम्यान अन्नधान्याचे उत्पादन ५० मिलीयन टन होते. स्वातंत्र्याच्यानंतर १०० मिलीयन टन झाले. पंधरा वर्षापूर्वी अन्नधान्याचे उत्पादन २२१ मिलीयन टन आहे. अन्नधान्याचे उत्पादन १९५० नंतर चौपट, पाचपट वाढले परंतु शेती व शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली दिसत नाही. राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. रमाकांत पितळेंच्या 'रिच ॲग्रीकल्चर ॲन्ड पुअरफार्मर' या पुस्तकात दिलेल्या आकडेवारीनुसार १९९१ मध्ये शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न ३८०२ रुपये होते. १२ वर्षानंतर म्हणजे २००२–०३ मध्ये ते उत्पन्न ३७३० रुपये पर्यंत खाली आले व आज त्याहीपेक्षा खाली आहे. याचाच अर्थ उत्पादनात वाढ होत गेली पण शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले नाही तर उलट कमी झाले.

आज रासायनिक खते, बी–बियाणे, किटकनाशके यांचा फार मोठ्या प्रमाणामध्ये शेतीमध्ये वापर होऊ लागला. त्यामुळे शेती खर्चीक होत गेली. आज शेती ही भांडवलधारीत होत गेली त्यामुळे बाजारभावामध्ये उदा. खते, बीयाणे, किटकनाशके यामध्ये फार मोठी वाढ होत गेली त्या तुलनेत शेतमालाला कमी भाव मिळाला. खर्च अधिक, उत्पादन कमी व भावदेखील कमी यामुळे शेतकरी असह्य होत गेला व शेवटी आत्महत्येच्या प्रमाणामध्ये वाढ होत गेली.

शेतीसंदर्भात शासकीय पातळीवर कोणतेही सरकार गंभीर असल्याचे दिसून येत नाही. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, जागतिक व्यापार संघटना यांचेही भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाले. विकसित देश आजही जागतिक व्यापार संघटनेचे नियम धाब्यावर बसवून आपल्या देशातील शेतकऱ्यांना अनुदाने देतच आहे.

१९९७ पासून जागतिक पातळीवर भारताची ओळख ही कापूस आयातदार देश म्हणून होऊ लागली. आपल्या देशातील पंचेविस हजार कापूस उत्पादकांना दरवर्षी सरासरी तीन अब्ज डॉलरपेक्षा अधिक अनुदान देणाऱ्या अमेरिकेतून कापूस भारतात येणार असेल तर या विषम स्पर्धेत भारतीय कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा निभाव कसा लागणार व कापसात असलेली जागतिक मंदी मोठ्या प्रमाणात अनुदानीत कापूस आयात होणार अशा परिस्थितीत भारतीय शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. या कचाट्यात तो कसा तग धरणार?

साधारणतः १५ वर्षापूर्वी ५० ते ६० टन गव्हाची आयात केल्या गेली. गव्हावरचे आयात शुल्क हटविण्यात आले. गव्हाच्या आयातीचे मुक्त परवाने देण्यात आले. देशात दरवर्षी सरासरी ५० ते ६० लाख टन खाद्यतेलाची आयात होते त्याकरिता पंधरा हजार कोटी रुपयाचे परकीय चलन मोजल्या जाते, डाळीच्या आयातीतही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे उलट मक्याचे भाव थोडेबहुत वाढल्याबरोबर मक्यावर निर्यातबंदी लादल्या गेली. कांदा महाग झाल्याबरोबर 'कांद्याने आणले डोळयात पाणी' म्हणून हाकाटी होते. चीन व पाकिस्तानमधून तात्काळ कांदा आयात केला जातो परंतु कांदा जेव्हा स्वस्त होतो तेव्हा कोणाच्याच डोळयात पाणी येत नाही. सरकारी हस्तक्षेप होत नाही. एकतर कांदा महाग झाल्यावर जर सरकारी हस्तक्षेप होत असेल तर त्याचे भाव एकदम पडल्यावरही सरकारी हस्तक्षेप व्हायला पाहिजे परंतु दुर्दैवाने तसे होत नाही आणि यातच शेतकरी पिचल्या जातो.

भारत हा कृषीप्रधान देश आहे असे आपण सगळेजण म्हणत असतो परंतु स्वातंत्र्याच्या ७३ वर्षानंतर कर्मचाऱ्यांकरिता सातवा वेतन आयोग येतो परंतु शेतकऱ्यांसाठी एकच राष्ट्रीय शेतकरी आयोग आणि त्यांच्याही शिफारशीला केराची टोपली दाखविली जाते.

पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीवर होणारा खर्च कमी कमी होत जात आहे व आज बजेटमध्ये अत्यल्प खर्च शेतीवर होताना दिसतो. यावरुन सरकारची निती आपल्या निदर्शनास येते.

आज भारतीय शेती व्यवसायावर चारही दिशाकडून मारा होताना दिसतो आहे तो थोपविण्याचा आम्ही प्रयत्न देखील करीत नाही तर त्यावर वरपांगी मलमपट्टी करण्याचे काम करतो. अगदी शेतकऱ्यांच्या जीवावर येईपर्यंत आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो व त्यानंतर उलट्या बोंबा मारणे चालू करतो. (उदा. व्यसनाधिनता, कर्जबाजारीपणा, मुलीचे लग्न, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी) यामुळे शेतकरी आत्महत्या करतो परंतु अनेक वर्षापासून आम्ही आमच्या शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्याकरिता ठोस पावले उचलली नाही याकरिता समाजप्रबोधनाची गरज आहे.

## संशोधन पध्दती

संशोधनकर्ता हा एका शेतकरी कुटुंबातून असून मागील वीस वर्षापासून समाजशास्त्र विषयाचा शिक्षक आहे. त्याने सामाजिक व्यवस्थांच्या अभ्यासासोबतच सामाजिक चळवळीविषयी अनेक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रातील लेखाचे वाचन केले तसेच शेतीविषयी तज्ज्ञ शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी नेते यांच्यासोबत अलिकडेच पारीत झालेल्या तीन कृषी कायद्याविषयी चर्चा केली व त्यानंतर त्यांनी 'भारतीय कृषी व्यवस्था कायदे आणि आंदोलन' या विषयाची निवड केली. याकरिता संशोधनकर्त्यानी वर्धा जिल्ह्यात चालू असलेल्या ५० आंदोलनकर्त्यांची मुलाखत घेऊन अलिकडेच पारीत झालेल्या कृषी कायद्याविषयी त्यांची मते जाणून घेतली व त्याचा समावेश या निबंधामध्ये करण्यात आला.

## उद्दिष्टे

१) कृषी कायद्याविषयी आंदोलनकर्त्यांची मते जाणून घेणे.

२) शेतकरी आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या जाणून घेणे.

३) शेतकरी आंदोलनाची दिशा जाणून घेणे.

## गृहीतकृत्ये

१) आंदोलनकर्त्यांना त्यांच्या मागण्याविषयी जाणीव आहे.

२) आंदोलनकर्त्यांना अलिकडेच पारीत झालेल्या कृषी कायद्याविषयी माहिती आहे.

३) आंदोलनकर्ते मागण्या पूर्ण झाल्याशिवाय आंदोलन चालू ठेवतील.

अलिकडेच म्हणजे कोवीड—२०१९ ची साथ चालू असताना भारत सरकारने ५ जुन २०२० ला शेतीशी संबंधित तीन वटहुकूम काढले. हे कृषी कायदे सद्या अस्तित्वात

पोहचविणारे आहेत. २४ सप्टेंबर २०२०
असलेल्या कृषीसंबंधित मूलभूत ढाच्याला आघात पोहचविणारे आहेत. २४ सप्टेंबर २०२० या विधेयका संबंधातील संसदेच्या
ला हे वटहुकूम संसदेसमोर चर्चेसाठी आणण्यात आले. या विधेयकांच्या त्रुटींवरती सखोल
कामकाजाचा आढावा घेतला तेव्हा असे लक्षात येते की, या विधेयकांच्या भविष्यातील दुष्परिणामांवरही चर्चा झाली नाही.
चर्चा झालीच नाही तसेच या कायद्याचा भविष्यातील दुष्परिणामांवरही चर्चा झाली नाही. राष्ट्रपतीची मान्यता मिळाली आणि
अशा स्थितीत २७ सप्टेबर २०२० ला विधेयकांना राष्ट्रपतीची मान्यता मिळाली आणि नेमके काय आहे हे जाणून
भारतीय गॅझेटमध्ये त्याची नोंद केली गेली. या तीन विधेयकामध्ये नेमके काय आहे हे जाणून नियंत्रण सैल करण्यात आली.
घेतले असता एका विधेयकाने शेतमालाच्या खरेदी विक्रीवरील नियंत्रण सैल करण्यात आली. जी नियंत्रणे
दुसऱ्या विधेयकामुळे आवश्यक वस्तू कायदा १९५५ अन्वये साठा करण्यावर जी नियंत्रणे आधारीत कंत्राटी
होती ती सैल करण्यात आली आणि तिसऱ्या विधेयकाने लिखीत करारावर आधारीत कंत्राटी की, सरकारने
शेतीचा अधिकार देण्यात आला. या विधेयकांवर अशी टीका करण्यात आली की, सरकारने निर्माण करण्याची
स्वस्त भावात वस्तू खरेदी करण्याची, तिचा साठा आणि कृत्रीम टंचाई निर्माण करण्याची व बहुराष्ट्र
आणि नंतर तिची भरमसाठ भावाने विक्री करण्याची संधी मोठे भांडवलदार व बहुराष्ट्र लुट करण्यास
कंपनीला मिळवून दिली आहे. हे तिन्ही कायदे शेतकऱ्यांची आणि ग्राहकांची लुट करण्यास काळाबाजार
मदत करतील अशी भीती आहे. या विधेयकामुळे केंद्राने साठेबाजी आणि काळाबाजार
कायदेशीर केला आहे असा आक्षेप आहे.

शेतकरी नेते, सामाजिक कार्यकर्ते, काही राजकीय पक्ष, अभ्यासक, शेतीविषयक तज्ज्ञ मंडळी यांनी या कायद्याला विरोध दर्शविला व त्यातुन पुढील दिशा ठरवून २६ नोव्हेंबर २०२० पासून या शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाली. सुरवातीला या आंदोलनाची व्याप्ती ही दिल्ली, हरियाणा, पंजाब, उत्तरप्रदेश या राज्यापुरती मर्यादित होती परंतु कालांतराने या आंदोलनाची व्याप्ती अनेक राज्यांमध्ये व जिल्ह्यांमध्ये वाढत गेली. त्याच आंदोलनाचा एक भाग असलेल्या महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यामध्ये सुध्दा शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाली. म्हणून संशोधनकर्त्यांने या आंदोलनामध्ये सहभागी ५० व्यक्तीच्या मुलाखती घेऊन कृषी कायदे व आंदोलनाविषयी त्यांची मते जाणून घेतली.

**सारणी क्र. ०१**

**कृषी कायद्याविषयी माहिती**

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १००.०० |
| २ | नाही | ०० | ००.०० |
| एकूण | | ५० | १००.०० |

आंदोलनकर्त्यांना कृषी कायद्याविषयी माहिती आहे काय? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता कृषी कायद्याविषयी १०० टक्के आंदोलकांना माहिती आहे एवढेच नाही तर हे कृषी कायदे तीन स्वरुपाचे असून ते शेतकरी विरोधी असून भांडवलदारांना पोषक आहे अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केल्या. यावरुन १०० टक्के आंदोलनकर्ते हे कृषी कायद्याविषयी जागरुक आहे.

**सारणी क्र. ०२**

**आंदोलनामध्ये सहभागी व्यक्ती**

| अ. क्र. | विवरण | वरंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी | ०६ | १२.०० |
| २ | सामाजिक कार्यकर्ते | १८ | ३६.०० |
| ३ | संघटनेचे कार्यकर्ते | २२ | ४४.०० |
| ४ | इतर | ०४ | ०८.०० |
| **एकूण** | | ५० | १००.०० |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, दिल्लीच्या सिमेवर सुरु असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ वर्धा येथे जे आंदोलन सुरु आहे त्यामध्ये सहभागी हे अधिकांश वेगवेगळया संघटनेचे कार्यकर्ते असून त्याची टक्केवारी ही ४४ आहे. यामध्ये प्रामुख्याने वर्धा शहरातील सामाजिक, सांस्कृतिक तसेच अनेक परिवर्तनवादी संघटनेच्या कार्यकर्त्यांचा समावेश आहे. या आंदोलनामध्ये ३६ टक्के सहभाग हा सामाजिक कार्यकर्त्यांचा आहे. शेतकरी वर्गाचा सहभाग हा फक्त १२ टक्के आहे तर इतर सदस्यांचा सहभाग हा ०८ टक्के आहे. यामध्ये प्रामुख्याने वेगवेगळया शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक यांचा सहभाग आहे. यावरुन आपल्या असे निदर्शनास येते की, या आंदोलनामध्ये प्रामुख्याने विविध संघटनेच्या कार्यकर्त्यांचा सहभाग हा अधिक आहे. त्यासोबतच या आंदोलनामध्ये कमी अधिक प्रमाणात सर्वच स्तरातील व्यक्तीचा समावेश आहे.

**सारणी क्र. ०३**

**कृषी कायद्यामुळे फायदा**

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी | ०० | ००.०० |
| २ | भांडवलदार | ३८ | ७६.०० |
| ३ | व्यापारी | ०९ | १८.०० |
| ४ | इतर | ०३ | ०६.०० |
| **एकूण** | | ५० | १००.०० |

वरील सारणीवरुन आपणास असे निदर्शनास येते की, अलीकडे जे कृषी कायदे पारीत झाले त्या कायद्याचा फायदा कोणाला होतो हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ७६ टक्के आंदोलनकर्त्यांनी या कायद्याचा फायदा भांडवलदाराला होईल अशी प्रतिक्रिया

व्यक्त केली. १८ टक्के आंदोलनकर्त्यांनी या कृषी कायद्याचा फायदा व्यापाऱ्यांना होईल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. ०३ टक्के आंदोलनकर्त्यांनी या कृषी कायद्याचा फायदा इतरांना होईल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. यामध्ये त्यांनी मध्यस्थी, दलाल यांचा उल्लेख केला तर हे कृषी कायदे शेतकऱ्यांच्या फायद्याचेच आहे अशा प्रकारची एकही आंदोलकांची प्रतिक्रिया आली नाही. यावरुन आपणास असे दिसून येते की, अलीकडे जे कृषी कायदे पारीत झाले त्याचा फायदा मोठ्या प्रमाणात भांडवलदारांना होतो असे आपल्या लक्षात येते.

**सारणी क्र. ०४**

**आंदोलनाचा कालावधी**

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तोडगा निघेपर्यंत | ०९ | १८.०० |
| २ | पूर्ण मागण्या मान्य होईपर्यंत | १३ | २६.०० |
| ३ | कृषी कायदे मागे घेतल्यानंतर | २८ | ५६.०० |
| | एकूण | ५० | १००.०० |

वरील सारणीवरुन आपल्या असे लक्षात येते की, हे आंदोलन कधीपर्यंत चालू राहील हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता अधिकांश म्हणजे ५६ टक्के उत्तरदात्यांनी हे आंदोलन जोपर्यंत कृषी कायदे हे मागे घेतल्या जाणार नाही तोपर्यंत चालू राहील अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. १३ टक्के उत्तरदात्यांनी पूर्ण मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन चालू राहील अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या तर ०९ टक्के उत्तरदात्यांनी जोपर्यंत तोडगा निघत नाही तोपर्यंत आंदोलन चालू राहील असे मत नोंदविले. यावरुन आपल्या असे लक्षात येते की, जोपर्यंत तिनही कृषी कायदे मागे घेतल्या जात नाही तोपर्यंत आंदोलन चालू राहील असेच अधिकांश म्हणजे ५६ टक्के उत्तरदात्यांना वाटते.

**सारणी क्र. ०५**

**आंदोलनाची पुढील दिशा**

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शांततेच्या मार्गाने | १३ | २६.०० |
| २ | बंदचे आवाहन करुन | ०४ | ०८.०० |
| ३ | रास्ता रोको, रेल्वे रोको | ०६ | १२.०० |
| ४ | केंद्रिय नेत्याच्या आदेशानुसार | २७ | ५४.०० |
| | एकूण | ५० | १००.०० |

वरील सारणीवरुन आपल्या असे निदर्शनास येते की, साधारणत: तीन महिन्यापासून चालू असलेल्या या आंदोलनाची पुढील दिशा जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता केंद्रिय

नेत्यांच्या आदेशानुसार हे आंदोलन चालू राहील अशी अधिकांश म्हणजे ५४ टक्के उत्तरदात्यांना प्रतिक्रिया व्यक्त केली. हे आंदोलन शांततेच्याच मार्गाने चालू राहील अशी २६ टक्के उत्तरदात्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. या आंदोलनाची पुढील दिशा संपूर्ण भारत बंदचे आवाहन केल्या जाईल असे १२ टक्के उत्तरदात्यांना वाटते तर ०४ टक्के उत्तरदात्यांना पुढील आंदोलनाची दिशा रास्ता रोको, रेल्वे रोको केल्या जाईल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. यावरुन आपणास असे निदर्शनास येते की, हे आंदोलन केंद्रिय नेत्यांच्या आदेशानुसार पुढे चालू राहील असे अधिकांश म्हणजे ५४ टक्के उत्तरदात्यांना वाटते.

## प्रमुख निष्कर्ष

१) कृषी कायद्याच्या विरोधातील आंदोलनामध्ये सहभागी सर्व म्हणजे १०० टक्के उत्तरदात्यांना कृषी कायद्याविषयी माहिती आहे.

२) कृषी कायद्याच्या विरोधातील आंदोलनामध्ये प्रामुख्याने सहभागी असणारे अधिकांश उत्तरदाते हे वेगवेगळया सामाजिक, सांस्कृतिक, परिवर्तनवादी संघटनेचे/चळवळीचे कार्यकर्ते आहेत.

३) अलिकडेच पारीत झालेल्या कृषी कायद्यामुळे भांडवलदारांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल असे अधिकांश उत्तरदात्यांना वाटते.

४) जोपर्यंत कृषी कायदे मागे घेतल्या जात नाही तोपर्यंत हे आंदोलन चालू राहील अशी अधिकांश उत्तरदात्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

५) या आंदोलनाची पुढील दिशा ही केंद्रिय नेत्यांच्या आदेशानुसार ठरविण्यात येईल अशी प्रतिक्रिया अधिकांश उत्तरदात्यांनी व्यक्त केली.

## संदर्भग्रंथ सूची

१) शहा, घनश्याम (२००८). भारतातील सामाजिक चळवळी. पुणे, डायमंड पब्लिकेशन.

२) जैन, पी. सी. (२००३). सामाजिक आंदोलन का समाजशास्त्र. जयपूर, नॅशनल पब्लिशिंग हाऊस.

३) देवगांवकर, एस. जी., देवगांवकर, शैलेजा आणि डुमरे, जयमाला (२००९). सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन. नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

४) तायडे, पुष्पा. विदर्भाचा ग्रामीण विकास. वर्धा, गिताई प्रकाशन.

५) ब्रम्हे, सुलभा. शेतकरी जात्यात. धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला २०.

६) भोळे, भाष्कर (२००६). शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्र. संपादक परिवर्तनाचा वाटसरु अंक दिपावली.

७) देशपांडे, राजीव (संपा.) (जानेवारी २०२१). अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र. सांगली, प्रकाशक राहुल सुर्यकांत थोरात.

MML